# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.स.आ.(नि)/11918 दिनांक 16.02.2021**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवास करणा-या भिक्षेकरी व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यासाठी मनुष्यबळ पुरविणा-या संस्था (एजन्सी) कडून स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे प्रस्ताव मागविण्याबात.

## सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त (नियोजन) समाजातील गरीब गरजू व्यक्तींकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तद्अनुषंगाने व केंद्रशासनाच्या परीपत्रकान्वये “भिक्षेकरी मुक्त अभियान”ही योजना राबविण्यात येणार आहे. सदर योजनेचा लाभ प्रत्येक भिक्षेकरी गरजू व्यक्तींपर्यंत पोहचविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपलिका क्षेत्रातील 24 विभाग क्षेत्रात रहिवास करणा-या भिक्षेकरी व्यक्तींचे सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे.

1. स्वारस्याची अभिव्यक्ती अंतर्गत संस्था (एजन्सी) साठी परिशिष्ट-अ खालील ठिकाणी उपलब्ध आहे.
2. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख दिनांक 03.03.2021 वेळ दुपारी 03.30 पर्यंत

   ठिकाण – सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय, पहिला मजला, राजगृह को.ऑप.हौ.सोसा.,बाळाशेठ मडूळकर मार्ग, एलफिन्स्टन (पश्चिम), मुंबई – 400 013. कागदपत्रे बंद लिफाफामध्ये सादर करावीत.
3. भिक्षेकरी व्यक्तींच्या सर्वेक्षणासाठी मनुष्यबळ पुरविणे या करीता स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थाळावर उपलब्ध असून, आवश्यकता भासल्यास स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी दिलेली मुदत एक किंवा अधिक वेळासाठी वाढवू शकते.
4. महानगरपालिका स्वारस्याची अभिव्यक्तीद्वारे प्राप्त झालेल्या संस्था(एजन्सी) यांची यादी तयार करुन, सदर कामासाठी स्थापन केलेल्या छाननी समितीकडे सादर करेल.

स्वारस्याची अभिव्यक्तीच्या अटी व शर्ती

**पार्श्वभूमिः** बृहन्मुंबई महानगरपालिकेने क्षेत्रातील भिक्षेक-यांना महिला व बाल कल्याण योजनेच्या जेंडर बजेट अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने भिक्षेक-यांची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्याने प्रत्येक भिक्षेक-यांपर्यंत योजनांचा लाभ मिळून देण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे. भिक्षेक-यांची विस्तृत माहिती सर्वेक्षणव्दारे जमा केल्यास महानगरपालिका क्षेत्रातीत सर्व भिक्षेक-यांना त्याचा लाभ पोचवता येईल. यासाठी भिक्षेक-यांची विस्तृत माहिती संस्था (एजन्सी) मार्फत जमा केल्यास ती भिक्षेक-यांचे आर्थिक व सामाजिक पुनवसन करण्यास उपयुक्त ठरेल. सदर सर्वेक्षण करण्यासाठीचा प्रस्ताव मा. आयुक्तांनी मंजुर केला असून सहाय्यक आयुक्त (नियोजन) खात्या तर्फे त्याचे पर्यवेक्षण केले जाईल.

**कामाचे स्वरुपः** म.न.पा.च्या 24 विभाग कार्यक्षेत्रात भिक्षेक-यांचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून इकोनोमीकल जीओग्राफिकल महानगरपालिका क्षेत्रातील भिक्षेक-यांची अदयावत माहिती जमा करणे.

**सर्वेक्षणाकरीता मनुष्यबळ पुरविणा-या संस्थां (एजन्सी) यांची भूमिका**

1. महानगरपालिकेच्या क्कार्याक्षेत्रातील २४ विभागामधील भिक्षेक-यांचे सर्वेक्षण करणे.
2. भिक्षेक-यांचे नाव व पत्ता, वडीलाचे नाव व पत्ता, वय, लिंग, कुंटुबातील सद्यस्याची संख्या, शिक्षण, भिक्षेक-याचा प्रकार, आधार कार्ड नंबर.
3. केंद्र शासन / राज्य शासन निराधार व इतर योजनांचा लाभ धारक आहेत का ?
4. शासन योजने अंतर्गत घरकुल मिळाले किंवा नाही.
5. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण जेंडर बजेट अंतर्गत कोणत्या योजनांचा लाभ घेतला आहे.
6. संस्था (एजन्सी) यांनी संबंधित सर्वेक्षित भिक्षेकरी व्यक्तींची डीजीटल प्रश्नांवली बनविणे अपेक्षित आहे. त्यासाठी लागणारे Software बृ.म.न.पा. मार्फत दिले जाईल परंतू त्यासाठी लागणारा मोबाईल, टॅबलेट हॅडसेट सदर संस्था (एजन्सी) मार्फत वैयक्तीक वापरले जातील.

**भिक्षेकरी सर्वेक्षणासाठी मनुष्यबळ पुरविणा-या संस्था (एजन्सी) यांच्यासाठी पूर्व अटी**

संस्था(एजन्सी)या शासन नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. सदर नोंदणीचे प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करताना जोडणे आवश्यकआहे.

1. बृहन्मुबंई महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत संस्था (एजन्सी) यांना प्राधान्य देण्यात येईल.
2. संस्था (एजन्सी) यांना बृहन्मुंबईतील कार्यक्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
3. संस्था (एजन्सी) यांच्याकडे सर्वेक्षणाकरीता पुरेसे प्रशिक्षीत मनुष्यबळ असणे, तसेच सर्वेक्षण माहिती (Data) अदयावत करण्याकरीता मोबाईल, टॅबलेट इ. साहीत्य असणे आवश्यक आहे. सदर साहित्य बृहन्मुबंई महानगरपालिकेकडून पुरविले जाणार नाही.
4. सदर सर्वेक्षणाकरीता मनुष्यबळ पुरविणे कामी संशोधन व सर्वेक्षण करणा-या शैक्षणिक संस्था व महाविदयालये पात्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
5. संस्था (एजन्सी) ची वार्षीक आर्थिक उलाढाल रू.5.00 लाखांपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.
6. अर्जा सोबत संस्था (एजन्सी) यांनी मागील तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट सादर करावा.
7. संस्था (एजन्सी) यांनी
   1) पुरविणा-या मनुष्यबळाला सर्वेक्षणाबाबतचा अनुभव असल्यास अर्जा सोबत सादर करावा.
   2) प्रत्यक्ष सर्वेक्षण माहिती अदयावतकरणा-या व्यक्तीचे वय 18 पेक्षा कमी व 60 पेक्षा अधिक नसावे.
   3) प्रत्यक्ष सर्वेक्षण माहिती अदयावतकरणा-या व्यक्तीचे कमीतकमी 12वी पर्यंतचे शिक्षण झालेले असावे.
   4) सर्वेक्षण माहिती अदयावत करणा-या व्यक्तीवर पर्यवेक्षण करणा-या पर्यवेक्षकांचे शिक्षण बी.एस.डब्ल्यु.व एम.एस.डब्ल्यु झालेल्यांना प्राधान्य देण्यात यावे.
   5) संस्था (एजन्सी) यांनी पुरविणा-या मनुष्यबळाची खालील माहिती प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू होण्यापुर्वीच बृ.म.न.पा. ला देणे आवश्यक आहे.

सर्वेक्षण करणा-याचे नावः

वयः

लिंगः

शिक्षणः

राहण्याच्या ठिकाचा पुर्ण पत्ताः

मोबाईल क्रः

आधारकार्ड क्रः

सर्वेक्षणाबाबतचा अनुभव असल्यासः

8. नियुक्त झालेल्या संस्था (एजन्सी) यांच्या बरोबर म.न.पा. अधिनियम कलम 70(1)(ब) नुसार लेखी करार करणे बंधनकारक राहिल.

9. संस्था (एजन्सी) तसेच सर्वेक्षण करणा-या व्यक्ती यांच्यावर कोणताही कायदेशीर गुन्हा नसावा तसेच न्यायालयीन दावा देखील प्रलंबीत नसावा.

10. प्रति भिक्षेकरी सर्वेक्षण व माहिती अदयावत करण्याकरीता जास्तीत जास्त रू. 40.00 फक्त संस्था (एजन्सी)यांना मानधन देण्यात येईल.

11. प्रतीदिन प्रती व्यक्तीने कमीत कमी 10 ते 15 भिक्षेक-यांचे सर्वेक्षण करून उपलब्ध माहिती तात्काळ ॲप मध्ये प्रश्नावली नुसार बिनचुक अदयावत करणे आवश्यक आहे.

12. संस्था(एजन्सी)यांनी सदर सर्वेक्षण व माहिती अदयावतीकरणाचे काम प्रत्यक्ष मंजुरी नंतर जास्तीत जास्त 3(तीन) महिन्याच्या आत सपुंर्ण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 24 विभांगामध्ये पुर्ण करणे बंधनकारक आहे.

13. प्रति आठवडा पुर्ण केलेल्या कामाचा समाधानकारक तपशिल पाहून प्रती आठवडा देयके मंजुर केली जातील. मंजुर देयकांचा निधी संस्था (एजन्सी)यांच्या बॅक खात्यावर देण्यात येईल.

14. संस्था (एजन्सी) यांनी प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती अदयावतीकरणाचे काम करणा-या व्यक्तीला दर आठवडयाला मानधन देणे आवश्यक आहे. मानधन दिल्याचा पुरावा, तपशिल बृ.म.न.पा.ला सादर करणे आवश्यक राहील त्याशिवाय त्यांची पुढील देयके मंजुर होणार नाहीत.

15. एकापेक्षा अधिक संस्था (एजन्सी) पात्र झाल्यास त्यांच्यामध्ये 24 प्रशासकीय विभागांचे सर्वेक्षणाकरीता मनुष्यबळ पुरविणयाचे काम समप्रमाणात किंवा 10% कमी-अधिक प्रमाणात विभागून देण्यात येईल.

## निवड प्रक्रीया

भिक्षेक-यांच्या सर्वेक्षणासाठी मनुष्यबळ पुरविणे याकरीता प्राप्त झालेल्या संस्थां (एजन्सी)यांची निवड, निवड समितीद्वारे करण्यात येईल. निवड समितीमध्ये खालील प्रमाणे असेल.

1. मा. उप आयुक्त (म.ख.खा.) - अध्यक्ष
2. प्रमुख लेखापाल (वित्त) - सदस्य
3. सहाय्यक आयुक्त (नियोजन) - सदस्य
4. चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी - सदस्य
5. विधी अधिकारी - सदस्य
6. मुख्य समाज विकास अधिकारी (नियोजन) - सदस्य सचीव

**तांत्रिक मूल्यमापन**

संस्थां (एजन्सी)यांचे मूल्यमापन उपरोक्त निवड समितीमार्फत करण्यात येईल.

1. संस्थां (एजन्सी) नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र - 10 गुण
2. आर्थिक उलाढाल रु. 5.00 लाखापर्यंत असल्याचा लेखापरिक्षण अहवाल - 20 गुण
3. मागील 3 वर्षांचा लेखा परिक्षण अहवाल - 20 गुण
4. संस्थां (एजन्सी) यांना सर्वेक्षणाचा अनुभव व संस्थेकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती - 25 गुण
5. संस्थां (एजन्सी) यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव प्रमाणपत्र - 25 गुण

# <u>परिशिष्ट - अ</u>

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| 1 | सर्वेक्षणाकरीता मनुष्यबळ पुरविणा-या संस्थां (एजन्सी) चे नांव -<br>नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता -<br>ई-मेल -<br>दूरध्वनी क्र. -<br>फॅक्स क्र. -<br>संकेतस्थळ - | |
| 2 | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव<br>दूरध्वनी क्र.<br>ई-मेल | |
| 3 | संस्थां (एजन्सी) चा नोंदणीचा तपशिल (प्रमाणपत्र जोडावे) | |
| 4 | तीन वर्षांचा ऑडीट रिपोर्ट (प्रमाणपत्र जोडावे) | |
| 5 | संस्थां (एजन्सी)मध्ये उपलब्ध कर्मचा-यांची संख्या व माहिती (पृष्ठ क्र. 3 प्रमाणे माहिती) | |
| 6 | यापूर्वी केलेल्या कामाबाबतचे प्रमाणपत्र | |
| 7 | संस्था (एजन्सी) ची मागील 3 वर्षाची आर्थिक उलाढाल रु. | |